**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्तविभाग**

**राष्ट्रीय बातमीपत्र**

**सकाळी 08 वाजून 30 मिनिटं**

**दिनांक:14.05.2026** **वारः गुरुवार**

---

1. खरीप हंगामासाठी 14 पिकांच्या किमान आधारभूत किंमतीतील वाढीस केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी
2. कच्च्या तसंच प्रक्रिया केलेल्या साखरेच्या निर्यातीवर सरकारची तत्काळ प्रभावानं बंदी
3. पंतप्रधान पाच देशांच्या दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात उद्या युएईला भेट देणार
4. नवी दिल्लीत ब्रिक्स गटाच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या दोन दिवसीय बैठकीला आजपासून सुरूवात आणि
5. उत्तरप्रदेशात पाऊस, धुळीचे वादळ आणि वीज कोसळण्याच्या घटनांमुळे 43 जणांचा मृत्यू

**<u>एमएसीवाढ</u>**

सन 2026-27 या विपणन वर्षासाठी 14 खरीप पिकांच्या किमान आधारभूत किमतीत अर्थात एमएसपीतील वाढीला केंद्रीय मंत्रिमंडळाच्या आर्थिक व्यवहारविषयक समितीनं काल मंजुरी दिली. पीक उत्पादकांनी पिकवलेल्या शेती मालाला योग्य मोबदला मिळेल हे सुनिश्चित करण्यासाठी सरकारनं खरीप पिकांच्या एमएसपीमध्ये वाढ केली असल्याचं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी नवी दिल्ली इथं या पत्रकार परिषदेत या निर्णयांची माहिती देताना सांगितलं. यंदाच्या खरीप विपणन हंगामात 824 लाख मेट्रिक टनांहून अधिक पीक खरेदी करण्याचं उद्दीष्ट असून त्यासाठी सरकारकडून शेतकऱ्यांना 2 लाख 60 हजार कोटी रुपयांचा मोबदला दिला

जाण्याची अपेक्षा आहे. काल मंजूर केलेल्या एमएसपी वाढीत सूर्यफुलाच्या बियांच्या किंमतीत सर्वाधिक म्हणजे प्रतिक्विंटल 622 रुपयांनी वाढ करण्यात आली आहे. त्याखालोखाल कापूस आणि तिळाच्या एमएसपीमध्ये वाढ करण्यात आली आहे. भारताच्या कोळसा आणि लिग्नाइट गॅसिफिकेशन उपक्रमाला गती देण्याच्या उद्देशानं कोळसा आणि लिग्नाइट गॅसिफिकेशन प्रकल्पांना प्रोत्साहन देण्यासाठीच्या योजनेलाही काल केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. या योजनेसाठी 37 हजार 500 कोटी रुपयांची आर्थिक तरतूद करण्यात आली आहे, अशी माहितीही अश्विनी वैष्णव यांनी दिली.

मंत्रिमंडळानं सार्वजनिक-खाजगी भागीदारी अंतर्गत खाजगी भागीदाराच्या सहभागातून दीर्घकालीन परवान्याद्वारे नागपूर आंतरराष्ट्रीय विमानतळाचा श्रेणीसुधार आणि आधुनिकीकरणालाही काल मंजुरी दिली. अश्विनी वैष्णव म्हणाले की, मल्टी-मोडल इंटरनॅशनल कार्गो हब अँड एअरपोर्ट ॲट नागपूर प्रकल्पांतर्गत नागपूर विमानतळाला प्रादेशिक विमान वाहतूक केंद्र बनवण्याच्या अनुषंगानं हा उल्लेखनीय निर्णय आहे.

## साखर निर्यात बंदी

सरकारनं कच्ची साखर, पांढरी साखर आणि शुद्ध केलेल्या साखरेसह साखर निर्यातीवर तात्काळ प्रभावाने बंदी घातली आहे. येत्या सप्टेंबरपर्यंत किंवा पुढील आदेशापर्यंत ही बंदी लागू असेल. एका अधिसूचनेनुसार, परदेशी व्यापार महासंचालनालयाने यासंदर्भात निर्यात धोरणात 'प्रतिबंधित' वरून 'निषिद्ध' असा बदल केला आहे. ही बंदी सीएक्सएल आणि TRQ कोट्याअंतर्गत युरोपियन युनियन आणि अमेरिकेला होणाऱ्या तसेच इतर देशांच्या अन्नसुरक्षेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी सरकार स्तरावर झालेल्या करारानुसार निर्यात होणाऱ्या साखरेला लागू असणार नाही. प्रत्यक्ष निर्यातीच्या प्रक्रियेत असलेल्या साखरेलाही यातून सूट देण्यात आली आहे.

**सोने चांदी इंपोर्ट**

केंद्र सरकारनं सोन्या चांदीवरील आयात शुल्क वाढवून 6 टक्क्यांवरुन 15 टक्के केलं आहे. तर प्लॅटिनमवरील आयातशुल्क 15 पूर्णांक 4 दशांश टक्के केलं असून सोन्याची नाणी आणि इतर घटकांवरच्या आयात शुल्कातही वाढ करण्यात आली आहे.

**मोदी परदेश दौरा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्यापासून येत्या 20 तारखेपर्यंत पाच देशांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. त्यांच्या या दौऱ्याची सुरुवात युएईपासून होणार असून ते उद्या अबुधाबीला भेट देतील. त्यानंतर ते नेदरलँड्स, स्वीडन, नॉर्वे आणि इटलीला भेट देणार आहेत. पंतप्रधान मोदी उद्या अबुधाबीत युएईचे अध्यक्ष शेख महंमद बिन झायेद अल नाह्यान यांची भेट घेणार आहेत. या द्विपक्षीय बैठकीत त्यांच्यामध्ये विशेषतः उर्जा सहकार्य तसंच परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय मुदद्यांवर चर्चा होणार असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे सचिव सिबी जॉर्ज यांनी सांगितलं. पंतप्रधान आणि युएईच्या अध्यक्षांची यापूर्वी अलीकडेच जानेवारीमध्ये प्रत्यक्ष भेट झाली होती. ऊर्जा सुरक्षेचा मुद्दा अजेंड्यावर अग्रस्थानी असेल; पश्चिम आशियातील वाढता भू-राजकीय तणाव आणि जागतिक तेल बाजारपेठांमधील किंमतीत सतत होत असलेल्या वाढीच्या पार्श्वभूमीवर, भारत ऊर्जेचा स्थिर पुरवठा सुनिश्चित करण्याच्या प्रयत्नात आहे.

**ब्रिक्स बैठक**

नवी दिल्लीत आज ब्रिक्स देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांची दोन दिवसीय बैठक सुरू होत आहे. या बैठकीचं अध्यक्षपद परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर भूषवतील. या बैठकीत ब्रिक्स देशांचे परराष्ट्र मंत्री, तसंच सदस्य आणि भागीदार देशांच्या

शिष्टमंडळांचा प्रमुख सहभाग असेल. हे सर्व मान्यवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचीही भेट घेणार आहेत.  या बैठकीदरम्यान, ब्रिक्स सदस्य देशांचे परराष्ट्र मंत्री परस्पर हिताच्या जागतिक आणि प्रादेशिक मुद्द्यांवर विचारांची देवाणघेवाण करतील. ब्रिक्स परराष्ट्र मंत्र्यांची यापूर्वीची बैठक गेल्या वर्षी 26 सप्टेंबरला संयुक्त राष्ट्रांच्या सर्वसाधारण सभेच्या 80 व्या अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर पार पडली होती.

**<u>ट्रम्प चीन दौरा</u>**

चीनचे इध्यक्ष शी जिनपिंग यांच्या समवेत दोन दिवसांच्या शिखर बैठकीनिमित्त अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प काल बेईजिंग इथं दाखल झाले. या शिखर बैठकीत इराण युद्ध, जागतिक ऊर्जा संकट, व्यापार संबंधातील तणाव, तैवान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयांना प्राधान्य असण्याची शक्यता आहे. जागतिक भू-राजकारणाच्या दृष्टीनं अत्यंत महत्त्वाच्या क्षणी ही शिखर परिषद होत आहे. या बैठकीतून मोठ्या फलनिष्पत्तीची अपेक्षा मर्यादित असली तरी  वाढत्या आंतरराष्ट्रीय अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर जगातील दोन देशांमधील संबंध स्थिर करण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न म्हणून या बैठकीकडे पाहिले जात आहे. होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा खुली होण्यास मदत करण्यासाठी आणि आखातातील तणाव कमी करण्याच्या उद्देशाने नव्याने वाटाघाटींना चालना मिळावी यासाठी इराणवर असलेल्या चीनच्या प्रभावाचा उपयोग करून घ्यावा, यासाठी ट्रम्प शी जिनपिंग यांच्यावर दबाव आणण्याची शक्यता आहे.

**<u>गोयल</u>**

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी वर्तमान वर्षात भारताची निर्यात 1 ट्रिलियन अमेरिकन डॉलर्सपर्यंत नेण्याचं आवाहन केलं आहे. भारताच्या मुक्त व्यापार करारांतर्गत आता जागतिक व्यापाराचा दोन-तृतीयांशहून अधिक भाग समाविष्ट आहे असं नवी दिल्लीत काल त्यांनी विविध

राज्यांमध्ये पायाभूत यंत्रणांची सुलभता या विषयावरील सातव्या अहवालाचं प्रकाशन करताना सांगितलं. याप्रसंगी त्यांच्या हस्ते लॉजिस्टीक्स क्षेत्रातील लिप्स-2025 या पुरस्कारांचं वितरणही करण्यात आलं. भारताला जागतिक स्तरावर स्पर्धाक्षम बनवण्यासाठी, लॉजिस्टिक्सचा खर्च कमी करणं हे सरकारनं एक तातडीचं राष्ट्रीय अभियान म्हणून हाती घेतलं आहे असं ते म्हणाले.

**मुदतवाढ**

केंद्रीय अन्वेषण विभागाचे संचालक प्रवीण सूद यांना सरकारनं एक वर्षासाठी मुदतवाढ दिली आहे. सूद यांना येत्या 24 मेपासून पुढील एक वर्षाकरिता सीबीआय संचालकपदी मुदतवाढीला केंद्रीय मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीनं मंजुरी दिली असल्याचं कार्मिक आणि प्रशिक्षण विभागानं जारी केलेल्या अधिकृत आदेशात म्हटलं आहे.

**नीट पेपर फुटी**

नीट पेपर फुटी प्रकरणी सीबीआयनं आत्तापर्यंत जयपूरमधून 3, गुरुग्राम, नाशिक आणि अहिल्यानगरमधून प्रत्येकी एक अशा 6 आरोपींना अटक केली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातल्या राहुरी तालुक्यातल्या धनंजय लोखंडे याला सीबीआयनं आज अटक केली. ट्रान्झिट रिमांड मिळाल्यानंतर त्याला दिल्लीला नेण्यात येईल. सकाळी 11 पासून 6 वाजेपर्यंत त्याच्यासह इतर दोघांची चौकशी झाली. पण इतरांना सीबीआयनं चौकशीनंतर सोडून दिलं. या प्रकरणात नाशिकमधून अटक केलेला शुभम खैरनार यालाही न्यायालयानं ट्रान्झिट रिमांड मंजूर केला आहे. त्याच्या भावालादेखील आज नांदगाव इथून ताब्यात घेण्यात आलं .

पुणे  पोलिसांनी पुण्यातल्या बिबवेवाडी परिसरातून एका महिलेला ताब्यात घेतलं आहे. प्राथमिक चौकशीनंतर त्या महिलेला सीबीआयच्या ताब्यात देण्यात आलं आहे.

**<u>यूपी पाऊस</u>**

उत्तर प्रदेशमध्ये गेल्या 24 तासांत झालेला पाऊस, धुळीचं वादळ आणि वीज पडण्याच्या घटनांमध्ये 43 जणांचा बळी गेला आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी या घटनांची दखल घेत, आपद्ग्रस्त नागरिकांना सर्वतोपरी मदत करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले आहेत. आकाशवाणीच्या वार्ताहराने दिलेल्या माहितीनुसार राज्यातील भदोही जिल्ह्यात सर्वाधिक 15 जण मरण पावले आहेत. तर अनेक जण जखमी झाले असून त्यांना विविध रुग्णालयांमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे.  मिर्झापूरमध्ये 10, फतेहपूरमध्ये 9, बदायूँमध्ये पाच तर बरेली जिल्ह्यात चार जणांचा मृत्यू झाले. बहुतांश जीवितहानी वीज कोसळून, भिंत आणि झाडे पडण्याच्या घटनांमुळे झाली आहे. काल राज्याच्या अनेक भागांत अचानक हवामानात बदल होऊन आलेलं धुळीचं वादळ आणि त्यानंतर गारपीट झाली. त्यामुळे अनेक ठिकाणी विजेचे खांबही कोसळले.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.